बुधवार, दि १३ नोव्हेंबर २०२४ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक ८ वा ● किंमत २ रु. ● पाने ४ RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# नारायण कुचे घेतात कामांसाठी टक्केवारी ; १० टक्के फिक्स्!

## पिरसावंगीचे सरपंच शिवाजीराव वेताळ यांनी प्रतिक्रिया देत केले शिक्कामोर्तब!

**जालना । प्रतिनिधी** - बदनापूर मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार नारायण कुचे हे टक्केवारी घेऊन कामाचे वाटप करत असल्याचे नेहेमीच बोलल्या जाते. विविध कामाच्या प्रमा ह्या त्यांच्या कार्यालयात आणल्या जातात आणि तेथूनच वाटपाचे काम होते. यापुर्वी देखील त्यांच्यावर अशा प्रकारचे आरोप करण्यात आले होते. लोकसभा निवडणुकीच्या पुर्वी विविध कामांसाठी देखील नारायण कुचे यांच्या कार्यालयात प्रमा असून त्यासाठी टक्केवारी मागण्याचा प्रकारही मागे घडला होता. त्यावेळी प्रशासनानेही हातीची घडी तोंडावर बोट ठेवण्या व्यतिरिक्त काहीही केले नाही. मात्र, पिरसावंगीचे सरपंच शिवाजीराव वेताळ यांनी दिलेल्या एका मुलाखतीत त्यावर शिक्कामोर्तब झाले असून आठ लाखांच्या कामासाठी ८० हजारांची मागणी त्यांनी केल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. विशेष म्हणजे १९९० पासून ते भारतीय जनता पक्षाचे काम करतात आणि ते रावसाहेब दानवे समर्थक आहेत. केवळ मराठा आणि दानवे समर्थक असल्यामुळे आ. कुचे हे त्रास देत असल्याचेही ते सांगतात.

याबाबत अधिक माहिती अशी की, पिरसावंगी गावातील हिंदु स्मशानभुम ीच्या शेडसाठी २३ नोव्हेंबर २०२३ ला प्रशासकीय मान्यता मिळाली. ही म ान्यता मुळात ग्रामपंचायतीकडे वर्ग करणे अपेक्षित असतांना आ. नारायण कुचे यांनी ती परस्पर त्यांच्या कार्यालयात नेली. तेथून त्यांचे पीए विनोद मगरे यांच्यामार्फत या कामासाठी दहा टक्के मागितल्या गेले. मात्र, सरपंच वेताळ यांची पैसे देण्याची मानसिकता नव्हती. तरी देखील त्यांनी गावातील विकास कामांसाठी एक पाऊल मागे येत पन्नास हजार रुपये देण्याचे मान्य केले. त्यानंतरही आ. कुचे यांनी ऐकले नाही अद्यापही हा प्रश्न तसाच प्रलंबीत आहे. आ. कुचे यांच्या या टक्केवारीच्या प्रकारामुळे अनेक गावातील कामे खोळंबली आहेत. कुचे हे दानवे यांचे समर्थक असलेल्यांना जाणून बुजून त्रास देण्याचे काम करत असल्याचाही आरोप सरपंच वेताळ यांनी केला आहे.

पिरसावंगी गावात सर्वधर्मिय लोकं गुण्या गोविंदाने राहतात. मी मराठा सरपंच असलो तरी सर्वच जाती-धर्मियांसाठी काम करतो. मात्र, नारायण कुचे यांनी गावातील विकास कामात खोडा घालण्याचे काम केले आहे. अंबादास. दानवे यांच्या सहकार्याने मी अनेक कामे आणण्याचा प्रयत्न केला होता तेव्हा देखील त्यांनी सर्व प्रमा ह्या कार्यालयात पळवून नेल्या असल्याचा आरोप सरपंच वेताळ यांनी केला आहे.

यासंदर्भात आमदार नारायण कुचे यांच्याची संपर्क साधण्याचा प्रयत्न केला मात्र, त्यांनी प्रतिसाद दिला नाही. यावर त्यांचे पीए विनोद मगरे यांनी युवा आदर्शशी बोलतांना सांगितले की, सरपंच शिवाजीरा वेताळ व माझा काही संबंध नाही. ते केवळ बदनाम करण्याच्या उद्देशाने आरोप करताहेत, यापुर्वी देखील मतभेद झाले आहेत. श्री वेताळ हे दर सहा महिने वर्षभराने वाद घालतात. असेही म गरे यांनी सांगितले. कामाच्या प्रमा बद्दल



विचारले असता मगरे म्हणाले की, त्या गावात हिंदु स्मशानभुमीचे काम झालेले असल्यामुळे ती प्रमा भिल्ल समाजासाठी आन्वी या गावातील कामासाठी वळविली.

### मारबत ...

**शिकवे मी उडायला**
**पंखा मुक्त फडफडत**
**किंमत न कार्यकर्त्यां**
**म्हणता गेलात उडत**
**स्ट्रॅटेजी विचीत्र अशी**
**बलाढ्य पक्षां फोडत**
**बीलमात्र आमचे नावे**
**बसला कशास फाडत**
**कसे डावलले आम्हां**
**कारण बसे चिवडत**
**मागचा निघाला पुढे**
**वाकुली दावे चिडवत**
**इतरवेळी आम्ही प्रिय**
**सत्तेत नसतो आवडत**
**सत्राशे साठ दे कारणे**
**सतत राहिले अडवत**
**वरती ते परिवार वाले**
**आम्हां ठेवले सडवत**
**आवळू ठेवे निष्ठामज**
**पक्षालानाही सोडवत**
**उभे राहतात राजपुत्र**
**चल बस ढोल बडवत**
**धुमधडाक्यातपालखी**
**काढा त्यांच्या मारबत**
**मूर्ती बसलो स्थितप्रज्ञ**
**भविष्यदुजाचे घडवत**
**स्वत: बने निष्कांचन**
**इतरांना राही मढवत**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# मतांचे विभाजन टाळा - इमरान प्रतापगढी

**जालना । प्रतिनिधी** - येत्या २० नोव्हेंबर रोजी होत असलेली निवडणूक ही तुमच्या आमच्या अस्तित्वाची लढाई आहे. म हायुतीच्या उमेदवाराला मदत होईल यासाठी काही जण निवडणूक लढवत आहेत. मात्र, अशा उमेदवारांना थारा न देता मतांचे विभाजन टाळा व महाविकास आघाडीचे उमेदवार कैलास गोरंटयाल यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहून त्यांना भरघोस मतांनी विजयी करावे असे आवाहन प्रसिद्ध शायर खा. इमरान प्रतापगडी यांनी काल सोम वारी येथे बोलतांना केले. त्याचबरोबर

जालना विधानसभा मतदार संघातील इंडिया महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार कैलास गोरंटयाल यांच्या प्रचारार्थ जुना जालना भागातील मनपाच्या स्व.कल्याणराव घोगरे क्रीडा संकुलावर काल सोमवारी सायंकाळी आयोजित करण्यात आलेल्या विशाल जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी उमेदवार कैलास गोरंटयाल यांच्यासह पक्षाचे लोकसभा प्रभारी माजी मंत्री डॉ. पी.सी.शर्मा, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते एकबाल पाशा, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर, अंकुशराव राऊत, जगदीश्वर राव, राजेंद्र राख, राकॉचे शहर जिल्हाध्यक्ष नंदकिशोर जांगडे, विजय चौधरी, बदर चाऊस, गणेश राऊत, नंदाताई पवार, अब्दुल रउफ परसूवाले, अकबर खान, अब्दुल रफीक, रिपाईचे जिल्हाध्यक्ष किशोर मघाडे, आपचे संजोग हिवाळे, सपाचे जिल्हाध्यक्ष शेख



नबी शिपोरकर, दिनकर घेवंदे, मुस्तकीन हमदुले, राजेंद्र जाधव, मधुकर घेवंदे, अतीक खान आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलतांना खा. इमरान प्रतापगडी म्हणाले की, एकीकडे जाती - धर्मात तेढ निर्माण प्रयत्न होत असतांना दुसरीकडे देशाला जोडण्याचे काम सुरू असून दोन विचारांची ही लढाई आहे. त्यामुळे ही निवडणूक **पान २ वर**

# बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा मुलमंत्राचा अवलंब करा - अब्दुल हफीज

**जालना । प्रतिनिधी** - भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध समाजाला शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा मुलमंत्र दिला . त्याचे अनुकरण करून विखुरलेला बौद्ध समाज एकत्र आला. त्यांनी प्रगती केली, तेव्हा मुस्लिम समाजाने देखील या मुलमंत्राचा अवलंब करून एकत्र येऊन प्रगती करावी, असे आवाहन जालना विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार पत्रकार अब्दुल हफीज यांनी येथे बोलताना केले.

जालना शहरातील नॅशनल नगरात रविवारी सभेचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पालिकेचे माजी सभापती अहमद बिन सईद चाऊस, मुख्तार मौलाना,फारुख पटेल,मुख्तार लीडर, मुजाहिद नुरी, बाबर खान,इनायत मामू, मेहमूद जहागीरदार, शेख शरीफ, तालेब शेख, शेख खालेद,शेख माजेद यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना श्री.हफीज म्हणाले की,आपल्या समाजाने किती दिवस अन्याय सहन करायचा, समाजातील निरपराध तरुणांना खोट्या गुन्ह्यात अडकवून जेलम ध्ये डांबले जातेय, व्यवसाय




बंद पडले जाताहेत, दारोदार भिक मागण्यासाठी मजबूर केले जातेय,आजमितीस आपला ईमान कमजोर झालाय परिणामी
धन - संपत्ती हातातून निसटून जात आहे,असे सांगून माणुसकीने कोणाचा सन्मान करावा तर ते आम्हाला भिती दाखवतात.जालना विधानसभेचा १९९० पासून २०२४ पर्यंत राजकीय ईतिहास पाहता आजी - माजी आमदारांनी राजकीय क्षेत्रात कोणालाही पुढे येवू दिले नाही. दोनच चेहरे आलटून पालटून निवडून येतात, कोणीही त्यांच्यासमोर निवडणूक लढवण्याची हिंमत दाखवली नाही, ती हिंमत मी सर्वधर्मीय समाजाच्या बळावर मी दाखविली आणि या निवडणुकीत अपक्ष उमेदवारी दाखल केली. कदाचित ईश्वराला काँग्रेस **पान २ वर**

# संपादकीय

## सारथी होतील का?

महाभारतात कृष्ण हा अर्जुनाचा सारथी होता. हे द्वापर युगातील घटना असून हे युग आठ लाख चौसष्ट हजार वर्षांपूर्वीचे असल्याचे सांगितल्या गेले आहे. असे असले तरी आजच्या कलयुगातही महाभारतातील अनेक दाखले दिले जातात. सध्या निवडणुकीचा हंगाम सुरु आहे. म हाराष्ट्रात विधानसभा निवडणुका आहेत. अशातच जालना विधानसभा मतदार संघातील महायुती शिवसेना (शिंदे गट)चे उमेदवार अर्जुनराव खोतकर यांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सोमवार रोजी जाहीर सभा संपन्न झाली. या सभेने वातावरण भगवेमय झालेले दिसले. सभेत एकनाथ शिंदे यांनी चौफेर फटकेबाजी करत अर्जुनराव खोतकर यांना विजयी करण्याचे आवाहन जनतेला केले. त्याच बरोबर महायुतीतील घटक पक्षाचे कान टोचत भाजपा व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांचे ज्येष्ठ नेते अनुक्रमे माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे व अरविंदराव चव्हाण यांना कृष्णाची उपमा दिली. शिंदे म्हणाले की, दानवे व चव्हाण हे कृष्ण असून या अर्जुनाला ते विधानसभेत पाठवतील. तत्पुर्वी उमेदवार अर्जुनराव खोतकर यांनीही दानवे, चव्हाण यांना कृष्ण संबोधित करून आपला पराभव अशक्य असल्याचे म्हटले होते. मुळात दानवे व खोतकर संघर्ष गेल्या दशकभरापासून जालनेकर अनुभवत आहे. २०१९ च्या लोकसभेच्या निवडणुकीत तर रावसाहेब दानवे विरोधात लोकसभा निवडणुक लढविण्यावर ठाम असलेले अर्जुनराव खोतकर यांची तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अन्य नेत्यांच्या मध्यस्थीमुळे त्यांनी रावसाहेब दानवे विरोधात काम न करता दानवेंना विजयी करण्यासाठी महत्त्वाची भुमिका बजावली होती. त्या निवडणुकीत तर रावसाहेब दानवे आजारी असतांना औरंगाबाद (सध्याचे छत्रपती संभाजीनगर) येथील एका हॉस्पीटलमध्ये ॲडमिट असतांना अर्जुनराव खोतकर यांनी भास्कर दानवे यांच्या खांद्याला खांदा लावून प्रचार करत रावसाहेब दानवेंना निवडून आणण्याची किमया साधली होती. त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत अर्जुनराव खोतकर यांच्या पराभवाला रावसाहेब दानवे हेच जबाबदार असल्याचे बोलल्या गेले. नुकत्याच झालेल्या २०२४ लोकसभा निवडणुकीतही दानवे व खोतकर यांच्यातील मतभेत चव्हाट्यावर आले होते. त्यावेळीही दिलजमाई झाली होती. येथे मात्र रावसाहेब दानवे यांना पराभवाचा झटका बसला. मुळात मराठा आंदोलन, ओबीसी आंदोलन, मुस्लीम आंदोलनाच्या माध्यमातून त्यांच्य आरक्षणाचा विषय हाताळण्यात सरकार अपयशी ठरल्यामुळेच राज्यभरात भाजपाच्या उमेदवारांना फटका बसला होता. मात्र, त्याचे खापर अर्जुनराव खोतकर यांच्यावर फोडण्याचा दानवे समर्थकांनी प्रयत्न केला. आता विधानसभा निवडणुकीची घोषणा झाल्यानंतरही दानवे आणि खोतकर वादामुळे महायुतीच्या जालन्यातील उमेदवाराला याचा फटका बसण्याची शक्यता राजकीय जाणकार व्यक्त करत होते. त्यातच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे प्रचारार्थ येणार असल्याने महायुतीच्या सर्वच नेत्यांना प्रचारात सहभागी होणे गरजेचे असल्यामुळे व अर्जुनराव खोतकर हे स्वतः सभेसाठीचे निमंत्रण घेऊन गेल्यामुळे तेथे त्यांची दिलजमाई झाल्याचे कळते. रावसाहेब दानवे हे एकनाथ शिंदे यांच्या सभेला उपस्थित राहिले. यावेळी उमेदवार खोतकर यांच्यासह मुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांचा उल्लेख कृष्ण म्हणून केला. आता या महायुतीच्या अर्जुनाचा सारथी रावसाहेब दानवे आहेत. त्यामुळे दानवे खरचं खोतकरांना निवडुन आणण्यासाठी प्रयत्नशील असतील का? असा प्रश्न जनतेतून उपस्थित होत असला तरी येणाऱ्या २३ नोव्हेंबर रोजी निकाल लागल्यानंतर अर्जुनाचा सारथी रावसाहेब दानवे यांच्या कार्याचा अंदाज लावता येईल.

## इतर वेळेच्या फटाके बाजीवर देखील बंदी घाला

फटाके आणि दिवाळी हे समीकरणच आहे. दरवर्षी दिवाळीत मोठ्या प्रमाणात फटाके वाजवले जातात त्यामुळे वायू प्रदुषण तर होतेच पण त्यासोबतच ध्वनी प्रदुषण देखील होते. फटाक्यांचे केवळ इतकेच दुष्परिणाम आहेत असे नाही तर याशिवायही अनेक दुष्परिणाम फटाक्यांमुळे होतात म्हणूनच दरवर्षी दिवाळी आली की शासकीय यंत्रणा, सामाजिक व सेवाभावी संस्था तसेच पर्यावरणवादी संघटना नागरिकांना दिवाळीत जास्त फटाके वाजवू नका असे आव्हान करतात. फटाकेमुक्त दिवाळी साजरी साजरी व्हावी यासाठी विविध उपक्रम राबवले जातात. शाळा, कॉलेजमधून त्याबाबत जनजागृती केली जाते. फटाक्यांचे दुष्परिणाम समजावून सांगितले जातात आणि ते योग्यही आहे, त्याची गरजही आहे. फटाकेमुक्त दिवाळी साजरी करणे ही काळाचीच गरज आहे. फटाक्यांमुळे अनेक दुष्परिणाम होतात. सरकारी यंत्रणा, सामाजिक व सेवाभावी संस्था तसेच पर्यावरणवादी संघटनांच्या आव्हानांना आणि प्रयत्नांना बऱ्यापैकी यश ही मिळत आहे. यावर्षी दिवाळीत फटाके वाजले मात्र मागील वर्षीच्या तुलनेत त्याचे प्रमाण कमी होते. फटाक्यांबाबत नागरिकांची जनजागृती होतेय ही अतिशय चांगली गोष्ट आहे. फटाक्यांच्या दुष्परिणामाबाबत नागरिक जागरूक होत आहे ही स्वागतार्ह बाब आहे याबाबत सरकारी यंत्रणा, सामाजिक व सेवाभावी संस्था तसेच पर्यावरणवादी संघटनांचे अभिनंदन करायला हवे तसेच नागरिकांचेही आभार मानावे लागेल. नागरिकांनी दिवाळीत फटक्यांबाबत जी जागरूकता दाखवली ती इतर वेळेसही दाखवायला हवी. कारण आपल्या देशात केवळ दिवाळीतच फटाके वाजवले जातात असे नाही तर वर्षभर कोणत्या ना कोणत्या कारणांनी फटाके वाजवले जातात मग तो सण उत्सव असो की आनंदाचं प्रसंग. फटाके वाजवूनच सण - उत्सव, आनंदाचे क्षण साजरे करण्याची प्रथाच पडली आहे. काही लोक नवीन वर्षाचे स्वागत फटाक्यांच्या आतषबाजीने करतात. ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री कानठळ्या बसतील इतकी फटाके वाजवली जातात. थर्टी फर्स्ट साजरा करताना उन्माद दाखवण्याच्या खटाटोपात नागरिक फटकेबाजी करतात. नाताळच्या रात्रीही फटाके वाजवले जातात. ईदच्या दिवशी चांद दिसला की फटाके वाजवली जातात. वाढदिवस साजरा करताना फटाके वाजवण्याचे फॅड हल्ली सुरू झाले आहे. लग्नातही फटाक्यांची आतषबाजी पाहायला मिळते. दिवाळीत फटाके वाजवू नका असे आव्हान करणाऱ्या राजकीय नेत्यांच्या राजकीय मेळाव्यात, विजयी मिरवणुकांतही फटाक्यांची मोठ्या प्रमाणात आतषबाजी होते. दिवाळीत जास्त फटाके वाजू नयेत यासाठी प्रयत्न करणारे या इतर वेळी केल्या जाणाऱ्या फटाकेबाजीकडे मात्र सोईस्करपणे दुर्लक्ष करतात. दिवाळीच्या पाच दिवसांच्या फटाक्यांमुळे जे दुष्परिणाम होतात तेच इतर वेळेच्या फटाकेबाजीतही होतात. त्यामुळे या इतर वेळेच्या फटाक्यांच्या आतषबाजीवर देखील बंधने घातली पाहिजेत. नागरिकांनीही फटाके वाजवूनच आनंद साजरा केला पाहिजे ही मानसिकता बदलायला हवी. नागरिकांनी फटाक्यांबाबत जी जागरूकता दिवाळीत दाखवली ती वर्षभर दाखवायला हवी.

**श्याम ठाणेदार,**
**दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

पान १ व ४ वरुन

### मतांचे विभाजन ...

केवळ आमदार निवडून देण्यापूर्ती मर्यादित नसून राज्याच्या सत्तेत कुणाला बसवायचे याबाबतचा निर्णय आपल्याला घ्यायचा आहे. लोकसभा निवडणुकीत चारशे पारचा नारा देणाऱ्यांना आपल्या सर्वांच्या एकोप्यामुळे २४० वर थांबावे लागले असून अशीच एकी येत्या विधानसभा निवडणुकीत त्यांना त्यांची जागा दाखवा असे आवाहन त्यांनी केले. कोणत्याही एका समाजाच्या मतांवर आमदार होणं शक्य नाही.जे कुणी आमदारकीचे स्वप्न मनात ठेवून निवडणूक लढवत आहेत त्यांना मतदान केले तर आपल्या मतांचे विभाजन होऊन त्याचा लाभ हा अप्रत्यक्षपणे शिंदे गटाच्या उमेदवाराला होणार आहे. त्यामुळे सर्वांनी जागृत राहून मत विभाजनाची ही खेळी हाणून पाडत महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आ. कैलास गोरंट्याल यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहून त्यांना भरघोस मतांनी विजयी करण्याचे आवाहन करून खा. इमरान प्रतापगढी यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या कारभारावर आपल्या भाषणातून खास शैलीत टीकेची तोफ डागली. तत्पूर्वी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर, एकबाल पाशा, अब्दुल रफीक, अब्दुल रउफ परसुवाले, अकबर खान, किशोर मघाडे, वाजेद पठाण, आमेर पाशा, नजीब लोहार, फारुख तुंडीवाले, अमजद खान, आरेफ खान, शेख फारुख आदींनी आपल्या भाषणातून मविआ उमेदवार कैलास गोरंट्याल यांनी मागील पाच वर्षात केलेल्या विकास कामांचा पाढा वाचून जे आज अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवत आहेत त्यांनी मुस्लिम समाजाच्या हितासाठी काय काम केले असा सवाल उपस्थित करत मतांचे विभाजन टाळण्याचे आवाहन उपस्थीत समाज बांधवांना केले. या कार्यक्रमास मुस्लिम समाज बांधवांसह जालना शहरातील महीला, पुरुष, युवक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**गोरंट्याल यांचे कर्ज फेडण्याची संधी गमावू नका - खा. प्रतापगडी**

महाराष्ट्राशी आपले नाते असल्याने काँग्रेस पक्षाचे नेते खा.राहुल गांधी यांनी आपल्याला या राज्यातून राज्यसभेची उमेदवारी दिली. या निवडणुकीत एका एका मतांसाठी मोठी आर्थिक उलाढाल झाली. जालन्याचे आमदार कैलास गोरंट्याल यांनी पहिले मतदान आपले राहील असे सांगून आपल्याला विजयाची खात्री दिली होती. त्यामुळे गोरंट्याल यांचे कर्ज फेडण्यासाठी आपण जालन्यात आलो आहे.आपण प्रथमच जालन्यात आलो असलो तरी ही शेवटची वेळ नक्की नाही. गोरंट्याल यांना विजयी करा, यावेळी त्यांना मंत्रीपदाची संधी असून मंत्री झाल्यानंतर आपण पुन्हा त्यांच्यासोबत जालना येथे येणार असल्याचे खा.प्रतापगडी शेवटी म्हणाले.

**शिंदे गटाची बी टीम ओळखा - आ.कैलास गोरंट्याल**

जालन्यात आपण पराभूत होऊ शकत नाही याचा अंदाज आपल्या प्रतिस्पर्धी उमेदवाराला आला आहे. पायाखालची वाळू सरकु लागल्याम ुळे धर्मनिरपेक्ष मतांचे विभाजन करण्याची खेळी आखली असून त्यांनी शिंदे गटाची बी टीम निवडणूक रिंगणात उतरवून दोन उमेदवार उभे केले आहेत असा आरोप मविआचे उमेदवार आ.कैलास गोरंट्याल यांनी केला आहे. शिंदे गटाच्या बी टीमचे उमेदवार कोण आहेत ही बाब सर्वांना माहीत असून मतांचे विभाजन करून विजयाचा मार्ग मोकळा करण्याचा आपल्या प्रतिस्पर्ध्यांच्या प्रयत्न जागरूक मतदार निश्चितपणे हाणून पाडतील आणि आपल्याला मोठया मतांनी विजयी करतील असा विश्वास व्यक्त करून गोरंट्याल यांनी मागील पाच वर्षात केलेल्या विकास कामांचा आढावा उपस्थितांसमोर मांडला. भविष्यात शहरातील जनतेला दररोज पाणी पुरवठा करण्याबरोबरच जालन्यासाठी एक विद्यापीठ देखील मंजूर करून आणणार असल्याची ग्वाही उमेदवार आ. कैलास गोरंट्याल यांनी यावेळी दिली.

### बाबासाहेब आंबेडकरांनी ...

पक्षाकडून नव्हे तर अपक्ष आमदार म्हणून निवडून द्यायचे आहे. जेंव्हा मी उमेदवारी अर्ज दाखल केला त्या दिवसापासून सर्वधर्मीय समाजातील मित्र मला सांगताहेत की हफीजभाई तुम्ही जरी मुस्लिम समाजाचे आहात तरी तुम्ही जातीय चेहरा घेवून कधी वावरले नाही असे सांगून श्री.हफीज म्हणाले की मला गर्व आहे की या माझ्या जालन्याच्या जमिनीवर जालना जिल्हा मराठी पत्रकार संघाचा मी १६ वर्ष जिल्हाध्यक्ष पदावर कार्य केले.राज्याच्या इतिहासात याची नोंद घेण्यात आली आहे. माझ्यासाठी व मुस्लिम समाजासाठी अभिमानास्पद बाब आहे.पत्रकारिता आणि राजकीय क्षेत्रात कार्यरत असताना मी प्रत्येक समाजासोबत जिव्हाळ्याचे संबंध जोपासले त्यामुळेच मी कालपासून सर्वधर्मीय मित्रांशी प्रत्यक्ष गाठी भेटी घेतोय तर सर्वांच्या प्रतिक्रिया एकच आहे की हफीजभाई निवडणूक निकालाच्या दिवशी २३ नोव्हेंबर रोजी तुम्हीच आमदार होणार यात कोणाचेही दुमत नाही,असा विश्वास श्री.हफीज यांनी यावेळी व्यक्त केला.

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिलेल्या राज्यघटनेच्या म ाध्यमातून लोकशाहीत सर्वांना मतदानाचा अधिकार दिलाय. लोकशाहीत कोणत्या समाजाचे किती मतदान याचा अभ्यास केला जातो.यात आपल्या जालना विधानसभा मतदारसंघात मुस्लिम समाज हा बहुसंख्येने आहे.तरी देखील विरोधक आपल्याला कमजोर समजतात, कारण किती वर्ष उलटली आपण एकत्रितरित्या आपली ताकद दाखविली नाही. अशा प्रसंगी माझ्या संतप्त भावना व्यक्त होतात.भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध सम ाजाला शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा मुलमंत्र दिला तेंव्हा विखुरलेला समाज एकत्र आला.आपल्या समाजाने देखील या मुलमंत्राचा अवलंब करून एकत्र यावे,किती दिवस अन्याय सहन करायचा,असे ते म्हणाले.

जालना नगर पालिकेचे महानगरपालिकेत परावर्तीत झालीय, ज्यांच्या हातात नगर पालिकेचे सत्ता होती त्यांनी दलीत, मुस्लिम, अठरा पगड जातींच्या वसाहतीतील नागरी समस्यांकडे कधीच लक्ष दिले नाही. सांड पाणी वाहून जाण्यासाठी नाल्या नाहीत, रस्त्यावर घाण वाहतेय, पिण्याचे पाण्याचे नियोजन नाही,गरीबांच्या घरांसाठी पी.आर.कार्ड नाहीत, पथ दिवे नाहीत अशा एक ना अनेक समस्यांना तोंड देत नागरिक आहे त्याच स्थितीत राहतात,असे सांगून श्री.हफीज म्हणाले की, प्रत्येक सम स्या प्राधान्याने सोडविण्यासाठी येणाऱ्या २० नोव्हेंबर रोजी कोणाच्याही भुल थापांना आणि अमिषाला बळी न पडता माझ्या सात किरणांसह पेनाची निब या निशाणीपुढील बटण दाबून मला प्रचंड बहुमताने विजयी करा,असे आवाहन अपक्ष उमेदवार पत्रकार अब्दुल हफीज यांनी यावेळी केले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# शिक्षकांनी अध्यापनातील संबोध लक्षात घ्यावे - डॉ. विजय शिंदे

**दत्ता देशमुख**

**टेंभूर्णी -** देशात आणि महाराष्ट्र मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू झाली आहे. त्यामध्ये अध्यापक आणि एका वर्षात ५० तासांचे प्रशिक्षण घेतले पाहिजे. या संदर्भात शासनाकडून नवनियुक्त शिक्षकांना प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम राबविण्यात आला. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था जालना च्या वतीने, इयत्ता पहिली ते बारावी नवनियुक्त शिक्षकांचे प्रशिक्षण राबविण्यात आले. जवळपास ३७० हून अधिक शिक्षकांनी या प्रशिक्षणात सहभाग नोंदवला. या प्रशिक्षणामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०20 मध्ये नमूद केलेल्या सगळ्या विषयांचा समावेश होता, ज्यात शालेय नेतृत्व व व्यवस्थापन, शालेय अभिलेखे सेवा शर्ती व नियमावली, विद्यार्थी लाभाच्या योजना, बहुत स्तरीय व बहुवर्ग अध्यापन पद्धती, अध्यापन पद्धतीची स्वायत्तता, अध्यापनास स्थानिक भाषेचा वापर, कला क्रीडा अनुभवातील एकात्मिक शिक्षण, वयानुरूप समक्ष वर्गात प्रवेश, मुलींचे शिक्षण, प्रारंभिक बाल्यावस्था व प्राथमिक शिक्षण, अध्ययन निष्पत्ती आधारित अध्ययन व अध्यापनांचे मूल्यमापन, अध्ययन अध्यापन वावर आधारित मूल्यमापन, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन, अध्ययन अध्यापनाचे अध्ययनाचे हेच मूल्यमापन, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची ओळख, बालकांचा मोफत व सक्तीचा अधिनियम २००९, लैंगिक गुन्ह्यापासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२, बहुविध बुद्धिमत्ता सामाजिक आणि भावनिक अध्ययन, २१ व्या शतकातील कौशल्य साक्षरता कौशल्य, भविष्यवेधी शिक्षण जीवन कौशल्य, शाश्वत विकासाची ध्येय,सामाजिक न्याय व समता, बाल हक्क संरक्षण, भविष्यवेधी शिक्षण वातावरणातील बदल, माहिती तंत्रज्ञानातील कौशल्य व तंत्रज्ञान, शालेय स्पर्धा परीक्षा, निपुण भारत अभियान, नवोपक्रम व कृती संशोधन, प्रकल्प केस स्टडी, तान तणावाचे व्यवस्थापन,आपत्ती व्यवस्थापन, शाळा स्तरावरील समित्या, विविध व्यासपीठ व संसाधनचा वापर, विविध शिक्षण संस्थांचा अभ्यास, नवनियुक्त शिक्षकांसाठी संदर्भ साहित्याचा वापर, व्यावसायिक अध्ययन समूह,या सर्व अभ्यास विषयावर, जालना जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य, राजेंद्र कांबळे, श्रीहरी दराडे, डॉक्टर कुमावत, संजय येवते, योगेश्वर जाधव, डॉक्टर सूर्यवंशी, उपप्राचार्य प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख, प्राध्यापक डॉक्टर आनंद जाधव, ढाकणे के व्ही, प्रा.महेश लाहोटी, निलेश जोशी, जयंत कुलकर्णी, डॉक्टर रूपाली नामेवार, विवेक कुलकर्णी,संतोष देशपांडे, बालाजी मदन, श्रीमती नरवडे, श्री सोल्हाटे, श्रीमती मीरा जगदाळे, श्री दीपक दराडे, श्रीमती निलोफर पटेल, श्रीमती सुजाता भालेराव, श्री वसीम पटेल, श्रीमती मनीषा पाटील, दादाभाऊ जगदाळे, डॉक्टर करुणा हिवाळे, श्रीमती प्रेरणा मोरे, श्री हरिभाऊ निकम,श्री महेश चौधरी, देविदास आठवे, सय्यद अख्तर, मंथजी ढाकरे, आशाताई मगरे,श्रीमती कल्पना पाटील, श्री मिसाळ,,श्री गव्हाड, श्री गायकवाड, आदी रिसोर्स सुलभकांनी व्याख्याने दिली. समारोपाच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉक्टर राजेंद्र कांबळे होते.विशेष जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे माजी प्राचार्य विजयराव शिंदे हे होते. सोबत जालना जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे सर्व प्राध्यापक सुलभकांमध्ये केवी ढाकणे, उपप्राचार्य प्राध्यापक दत्ता देशमुख.



यांची उपस्थिती होती. विजय शिंदे यांनी सांगितले किं शिक्षक आणि शिकवताना विद्यार्थ्यांचे अध्ययनाचे संबोध लक्षात घेतले पाहिजे. ज्या शिक्षकांनी संबोध लक्षात आले त्यांचा अध्यापन उत्कृष्ट दर्जाचा होईल. तसेच विद्यार्थी हा विविध स्पर्धा परीक्षा टिकेल यासाठी प्रयत्न केले पाहिजे. त्यांनी विविध मुद्द्यांनी ते समजावून सांगितले. तसेच अध्यक्ष स्थानावरून बोलताना डॉक्टर राजेंद्र कांबळे यांनी शिक्षकांनी शिस्तबद्ध पद्धतीने हजेरी लावली आणि समाधानकारक प्रशिक्षण घेतले त्याबद्दल सर्व प्रशिक्षणार त्यांचे अभिनंदन केले. त्यांनी हे सांगितले की आमच्या सर्व सोलबकांनी सर्व शिक्षकांना योग्य पद्धतीने ज्ञान दिले. त्याचबरोबर ते पुढे असे म्हणाले की शिक्षणातील आव्हान आपण समजावून घेतले पाहिजे आणि त्या आव्हानाला सामोरे गेले पाहिजे. दोन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०20 मध्ये आव्हाने यावर भर दिला असून भविष्यात विद्यार्थ्याला अनेक कौशल्य विकसित करता आली पाहिजे ही थीम या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात असल्याने व तसेच वर्षभरात ५0 तासांचे प्रशिक्षण शिक्षकांना बंधनकारक असल्याने शिक्षक आणि प्रशिक्षण घेतलेच पाहिजे तरच नवीन बदल शिक्षकांना कळतील. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नवनियुक्त शिक्षकांमधील शिक्षकांनी केले आणि आभार प्रदर्शन सुद्धा त्यांनीच केले.

# जनतेसाठी काम करणारे सरकार राज्यात हवे- सीमाताई खोतकर

## खोतकर यांना विजयी करण्यासाठी खोतकर परिवार प्रचारात



**जालना । प्रतिनिधी -** महायुतीचे (शिवसेना) अधिकृत उमेदवार श्री. अर्जुनराव खोतकर याना विजयी केल्यास ते जनतेसाठी चोवीस तास उपलब्ध असतील, महायुती सरकारने केवळ लाकडी बहिन योजनाच आणली नाही तर अनेक प्रकारच्या योजना जनतेसाठी ह्या सरकारने आणल्या असून भविष्यात देखील ते जनतेसाठीच काम करणारे सरकार असेल, असा विश्वास सिमाताई खोतकर यांनी व्यक्त केला आहे.

शिवसेना, भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाइं व मित्र पक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार अर्जुन पंडितराव खोतकर यांच्या प्रचार्थ सौ. सिमाताई खोतकर व सौ. दर्शना खोतकर- झोल यांनी विविध ठिकाणी मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या. प्रभाग क्रमांक १६ मधील श्री. राम मंदीर, बडी सडक, कालिकुर्ती, भक्कड वाडा, श्री. रामदेव बाबा गल्ली, श्री. हनुमान मंदीर, श्री. दुर्गा माता रोड, मिशन हॉस्पिटल, दांनकुवर शाळा, अहिर भवन, श्री. शनी मंदिर येथील स्थानिक नागरिकांची सौ. दर्शना खोतकर झोल यांनी भेट घेऊन डोअर टू डोअर प्रचार केला. याप्रसंगी शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते, मतदार बंधू भगिनींचा अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला.

यावेळी बोलतांना सौ. खोतकर म्हणाल्या की, मेडीकल कॉलेस खरे तर यांनी आणले. मात्र तो भामटा सांगतो आम्ही आणले, महानगर पालिकेचा संपूर्णपणे बट्ट्याबोळ केला आहे. अर्जुनराव खोतकर सत्तेवर आले तर संपूर्ण कारभार सुधाण्यात येईल. पाणी सुध्दा त्यांनी आणले मात्र हा भामटा स्वतःला जलसम्राट म्हणून घेत आहे, असे सांगून त्या म्हणाल्या की,

**हे केवळ श्रेय घेत आहेत कामे महायुतीच्या सरकारने केली, चांगल्या योजना बंद करण्याचे पाप महाविकास आघाडी करते**

राज्यातले रस्ते, आरोग्य सेवा, परिवहन सेवा, पाणी व्यवस्था, शिक्षण व्यवस्था, शेतकर्यांचे शेती विषयक योजना, वयोवृध्द मंडळींना वयोश्री योजना, महिला साठी दरमहा पंधरा रुपये देणारी लाडकी बहिण योजना या सर्व योजना महायुती सरकारने राबविल्या आहेत. आघाडी काय केले? तर काहीच नाही. उलट पक्षी त्यांनी चालू असलेल्या चांगल्या योजना बंद करण्याचे पाप केले. उद्या ते जरी सत्तेवर आले तर हेच करणार आहेत. म्हणून महायुतीच्या म्हणजेच धनुष्यबाण या चिन्हासमोरील बटन दाबून प्रचंड मतांनी विजयी करा, असे आवाहन शेवटी सौ. सिमाताई खोतकर यांनी केले.

# आपला विजयरथ कोणीही रोखू शकत नाही

## अर्जुनराव खोतकर यांनी व्यक्त केला विश्वास

**जालना । प्रतिनिधी -** मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांची काल जालन्यात जंगी सभा झाली आणि संपूर्ण वातावरण ढवळून निघाल्याने त्यात बदल झाल्याचेही जाणवत आहे. त्यामुळे आपला विजय निश्चित असून तो कोणीही रोखू शकत नाही, असा विश्वास व्यक्त करतांनाच ते म्हणाले की, विरोधकांना केवळ आपल्यावर टिका केल्याचे समाधान वाटत असेल तर वाटू द्या, त्यांना आपले नांव घेतल्याशिवाय त्यांचा दिवस जात नाही, याचाच अर्थ मतदारराजा हा आपल्या बाजूने उभा आहे, त्यांचा आशिर्वाद हा धनुष्यबाणालाच मिळणार आहे, असे प्रतिपादन शिवसेना, भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाइं व मित्र पक्ष व महायुतीचे लोकप्रिय अधिकृत उमेदवार अर्जुन पंडितराव खोतकर यांनी विविध ठिकाणी मतदारांच्या गाठी भेटी घेऊन मतदारांशी संवाद साधला. श्री. अर्जुनराव खोतकर यांनी नुकत्याच जामवाडी, गोदेगांव, वंजार उम्रद, माळशेंद्रा, साळेगांव, शिवनगर, मयुर पार्क, सोरटी पार्क, कृष्णबन सोसायटीला भेटी देऊन मतदारांशी संवाद साधला. यावेळी बोलतांना श्री. खोतकर म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांची काल जालन्यात जंगी सभा झाली आणि संपूर्ण वातावरण ढवळून निघाल्याने त्यात बदल झाल्याचेही जाणवत आहे. त्यामुळे आपला विजय निश्चित असून तो कोणीही रोखू शकत नाही, असा विश्वास व्यक्त करतांनाच ते म्हणाले की,



विरोधकांना केवळ आपल्यावर टिका केल्याचे समाधान वाटत असेल तर वाटू द्या, त्यांना आपले नांव घेतल्याशिवाय त्यांचा दिवस जात नाही, याचाच अर्थ मतदारराजा हा आपल्या बाजूने उभा आहे, त्यांचा आशिर्वाद हा धनुष्यबाणालाच मिळणार आहे. विद्यमान आमदाराने सत्तेवर असूनही कोणतीही कामे केली नाहीत. उलट आपण आणलेल्या कामांवर दावा केला जात आहे. मात्र वस्तुस्थिती लपून राहत नाही. आपण सत्तेवर नसतांनाही जालन्याचा पाणी प्रश्न मिटवला. मेडीकल कॉलेज जालन्याला आणले. परंतू विरोधी आमदार मात्र मी हे केले, ते केले, असे सांगत सुटले आहेत, हे त्यांना शोभेणारे नसले तरी आपले नांव घेतल्याशिवाय आणि आपल्यावर टिका केल्याशिवाय त्यांचा दिवस जात नाही, असे सांगून श्री. खोतकर म्हणाले की, महानगर पालिकेचा संपूर्णपणे बट्ट्याबोळ केला आहे. आपण सत्तेवर आलो तर संपूर्ण कामगार सुधाण्यात येईल. पाणी सुध्दा आपण आणले मात्र हा भामटा स्वतःला जलसम्राट म्हणून घेत आहे. पदवी ही लोकांनी द्यायला हवी. स्वतःतर कोणीही जलसम्राट म्हणून मिरवेल, असे सांगून ते म्हणाले की, राज्यातले रस्ते, आरोग्य सेवा, परिवहन सेवा, पाणी व्यवस्था, शिक्षण व्यवस्था, शेतकर्यांचे शेती विषयक योजना, वयोवृध्द मंडळींना वयोश्री योजना, महिला साठी दरमहा पंधरा रुपये या सर्व योजना महायुती सरकारने राबविल्या आहेत. त्यामुळे देते देशातील पहिले सरकार ठरले आहे. आपले कोणतेही काम असू द्यात ते मार्गी लावण्याचा पूर्णपणे प्रयत्न केला जाईल, असे आश्वासनही शेवटी श्री. खोतकर यांनी दिले.

# शिक्षकांकडून गोशाळेला दिला गूळ अन् ढेप

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** जाफराबाद तालुक्यातील गोंधनखेडा येथील संत जनार्दन स्वामी गोशाळेला ईबीके विद्यालयातर्फे गायींसाठी अन्नदान देण्यात आले आहे. यामध्ये गोआष्टमीचे मुहूर्त साधून शनिवारी या गोशाळेतील गाईसाठी १२ क्विंटल ढेप व गुळाचे दान करण्यात आले.

मागील तीन वर्षांपासून सातत्याने या शाळेतील शिक्षक दरमहा काही रक्कम गोशाळेच्या नावे जमा करतात. वर्षाच्या शेवटी एकत्रित रकमेतून या गोशाळेतील गाईंसाठी अशा प्रकारे दान दिले जाते.

शनिवारी हे दान गौरीशंकर आश्रमाचे प्रमुख तथा या गोशाळेचे चालक महेश गिरी महाराज यांच्या उपस्थितीत गायींची विधीवत पूजा करून गोशाळेला दिले. यावेळी महेश गौरीशंकर आश्रम प्रमुख शिक्षण संस्थेचे सचिव नंदलाल काबरा, अध्यक्ष देवराव देशमुख, मुख्याध्यापक ज्ञानेश चव्हाण, ज्ञानेश्वर सुरुशे, संतोष उगले, मधुकर देशमुख गुलाब डहाके यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हिंदू धर्मात प्राणीमात्रावर भूतदया दाखविण्याचे विशेष पुण्य आहे. आमच्या गोशाळेत जवळपास ३00 गोधनाचे संगोपन होत आहे. अनेक दात्यांच्या दातृत्वातून या गायींच्या चारा-पाण्याची व्यवस्था होत असते. त्यात ईबीके विद्यालयाचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे. या मुक्या जनावरांचा आशीर्वाद त्यांना नक्कीच मिळेल. अशी प्रतिक्रिया महेशगिरी महाराज यांनी दिली.

# जनतेच्या प्रश्नांची जाण असणाऱ्या घाटगेंना पाठींबा - मुधकरराजे आर्दड

## टोपे, उढाण जनतेच्या प्रश्नांसाठी कधी आले नसल्याचा केला दावा

**घनसावंगी । प्रतिनिधी -** विधानसभा निवडणुकीत जनतेच्या आग्रहामुळे अपक्ष निवडणूक लढवत असलेले समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांना सर्वसामान्य जनतेचा मोठा पाठिंबा मिळत आहे. त्यात मराठवाड्याचे माजी विभागीय आयुक्त मधुकरराजे आर्दड यांनी देखील मंगळवारी आपला जाहीर पाठिंबा त्यांना दिला आहे. घनसावंगी विधानसभा क्षेत्रातील विकासाच्या प्रश्नासाठी सतीश घाटगे हे योग्य उमेदवार असून त्यांच्याकडे शस्वत विकासाचे व्हिजन असल्याने त्यांना साथ देण्याचे आवाहनही त्यांनी जनतेला केले आहे.

माजी विभागीय आयुक्त मधुकरराजे आर्दड यांनी देखील विधानसभा निवडणुकीत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला होता. परंतु, काही कारणास्तव त्यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. त्यांना शिवसेना शिंदे गटाकडून उमेदवारी मिळेल अशी अपेक्षा होती. परंतु तिकीट मिळाले नाही म्हणून शांत बसण्याऐवजी घनसावंगी विधानसभा मतदारसंघाच्या विकासासाठी सतीश घाटगे यांना पाठिंबा देत असल्याचे तानी जाहीर केले. हा पाठिंबा जाहीर करताना त्यांनी सांगितले की, कोणत्याही संविधानिक पदावर नसताना सतीश घाटगे यांनी केलेले विकासाचे काम, विविध घटकांना केलेली मदत ही एका आदर्श लोकप्रतिनिधी सारखी आहे. असाच लोकप्रतिनिधी घनसावंगी विधानसभेतील रखडलेले प्रश्न मार्गी लावू शकतो. मराठवाड्यात सतीश घाटगे यांच्यासारखे काम कोणत्याही लोकप्रतिनिधीला करता आलेले नाहीये. कोणत्याही पदावर नसताना त्यांनी केलेले हे काम कौतुकास्पद आहे. अशाच मणसाची घनसावंगी विधानसभेला गरज आहे.



मी विभागीय आयुक्त असताना आमदार राजेश टोपे, हिकमत उढाण हे कधीही घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील विकासाचे , जनतेचे प्रश्न घेऊन माझ्याकडे आले नाही. असेही त्यांनी सांगितले. घनसावंगी विधानसभा मतदारसंघात परिवर्तन व्हावे, अशी जनतेची इच्छा आहे आणि या परिवर्तनासाठी एका चांगल्या माणसाच्या मागे उभे राहणं हे माझं कर्तव्य आहे. म्हणून मी सतीश घाटगे यांना माझा पाठिंबा दिला आहे. या लढाईत मी त्यांच्या सोबत असेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# ‘बेटर टुमॉरो फाउंडेशन’तर्फे शाळेसाठी मदत

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** जाफराबाद तालुक्यातील जवखेडा ठेंग येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेला सेवाभावी संस्थेतर्फे निधी देण्यात आला. पुणे येथील बेटर टुमॉरो फाउंडेशनतर्फे हा निधी शाळेला देण्यासाठी फाउंडेशनचे सचिव अंकुश वनारसे यांनी पुढाकार घेतला आहे.

फाउंडेशनतर्फे शाळेच्या शैक्षणिक गरजा भागवण्यासाठी २५ हजार रुपये निधी दिला आहे. यामधून शाळेसाठी साउंड सिस्टीम घेतली जाणार असल्याची माहिती मुख्याध्यापक डॉ. राजेंद्र पवार यांनी दिली. या फाउंडेशनतर्फे वेगवेगळे सामाजिक उपक्रम घेतले जात असतात. यामध्ये वाचन चळवळीला गती मिळावी म्हणून मोठ्या प्रमाणात पुस्तकांचेही वितरण केले जाते. यापूर्वी फाउंडेशनने या शाळेला एक प्रोजेक्टरही भेट दिले आहे. ग्रामीण भागात शैक्षणिक व सामाजिक चळवळीला हातभार लागावा म्हणून फाउंडेशनतर्फे खारीचा वाटा उचलला जातो, असे सचिव अंकुश वनारसे म्हणाले. जनेश्वर आश्रमाचे प्रमुख ज्ञानेश्वर माऊली यांच्या हस्ते धनादेश दिला. यावेळी वामनराव सानप, मुख्याध्यापक डॉ. राजेंद्र पवार, शिक्षक गजानन अंभोरे, गणेश फुकट, नीलेश हाडे, गणेश वरगणे, पुष्पा साखरे, मुंजाराम शिराळे आदींची उपस्थिती होती.

## लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई; सोलार पॅनलच्या सर्व्हेसाठी केली पैशाची मागणी

# महावितरणचे दोन कंत्राटी कामगार जाळ्यात

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील तक्रारदार यांनी सोलार पॅनल मिळण्यासाठी ऑनलाईन अर्ज केलेला होता. सोलार पॅनल लावण्यासाठी जागेचा सर्वे करून देण्याच्या कामासाठी महावितरण कंपनीचे फिटर, इकोझन सोलर कंपनीच्या दोन कंत्राटी कामगारांनी तक्रारदाराकडून एक हजाराची लाच मागणी करुन ती स्वीकारली. दोघा कामगारांना रंगेहाथ पकडले असून याप्रकरणी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. ही कारवाई जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने ९ नोव्हेंबर रोजी टेंभुर्णी येथे केली.

तक्रारदार यांचे सोलार पॅनल मिळण्यासाठीचे ऑनलाईन अर्जावरून त्याबाबतचा सर्वे करून देण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे आरोपी समाधान धोंडीबा लोखंडे, (पद फिटर, इकोझन सोलर कंपनी, पुणे रा. आंबेगाव ता. जाफ्राबाद जि. जालना कंत्राटी) यांच्याकडे आहे. तक्रारदार यांचे सोलार पॅनल मिळण्यासाठीचे ऑनलाईन अर्जावरून त्याबाबतचा सर्वे करून देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे आरोपी समाधान लोखंडे याने १ हजार रुपये लाचेची मागणी करुन, लाचेची रक्कम आरोपी कौसर नसीर शेख, (बाह्यस्त्रोत कंत्राटी, रा. दहेगाव ता. जाफराबाद (कंत्राटी) यांच्याकडे देण्यास सांगितले. यावेळी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने लाच घेताना रंगेहाथ पकडले. ही कारवाई सापळा अधिकारी पोलीस उपअधीक्षक बाळू एस. जाधवर, सापळा पथक पोलीस हवालदार गजानन घायवट, गणेश चेके, भालचंद्र बिनोरकर आदींनी केली.

# काचनेरा येथे पायोनीयर कंपनीचा शेतकरी मेळावा

**जाफराबाद । प्रतिनिधी -** कोर्टे वा ॲग्रीसायन्स सीड्स प्रा.ली. (पायोनीयर सीड्स) च्या वतीने जाफराबाद तालुक्यातील काचनेरा येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मेळाव्याला काचनेरा, नांदखेडा, किन्ही व डोलखेडा सह परिसरातील प्रगतिशील शेतकऱ्यांना निमंत्रित करण्यात आले होते.




उत्पानाबाबत तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

यावेळी व्यासपीठावर सेवा निवृत्त सैनिक सीताराम पवार, रमेश मोकाटे, सरपंच गजानन डोईफोडे, माजी सरपंच कैलास ताठे, माजी चेअरमन संतोष सवडे, शेतकरी रामप्रसाद डोईफोडे, माजी उपसरपंच रामदास शेळके, आण्णा बापु सवडे, सुदाम सवडे, संदीप सवडे, उद्धव जयाभाये, दिनकर जाधव, पंढरीनाथ जाधव, सुधाकर मोरे, चत्रभुज मोरे, सुदाम जाधव, बाळू जाधव, गणेश जाधव, कंपनीचे कर्मचारी कैलास भालके, भगवान शिराळकर यांच्यासह शेकडो शेतकरी उपस्थित होते.

यावेळी कंपनीचे जालना जिल्हा कार्यक्षेत्र मॅनेजर गणेश पैठणकर यांनी पोयीनीयर सीड्सच्या वाणाबद्दल मार्गदर्शन करताना पुढे म्हणाले की, कोणतेही उत्पादन घेताना शेतकऱ्यांनी पारंपरिक पद्धतीचा अवलंब न करता नवनवीन पद्धतींचा अवलंब करून जास्तीत-जास्त उत्पादन घ्यावे. त्यात आमच्या मक्याच्या वाणाची लागवड करतांना दोन ओळीतील अंतर दोन फ ूट तर दोन झाडांतील अंतर ९ इंच या पद्धतीने लागवड, पाण्याचे नियोजन व खताची योग्य मात्रा दिल्यास एकरी ५० ते ५५ क्विंटल उत्पन्न नक्की होणार असेही सांगितले.

त्यामुळे यावरही विश्वास न ठेवता त्यामुळेच कंपनी पीक मळणी प्रत्याक्षिक पाहणी कार्यक्रमाचे आयोजन करत आहे.

शेतकऱ्यांसमोर पीकही मळणी करून वजन करून दाखवत आहे. यासह अनेक बाबतीत मार्गदर्शन केले. कार्यक्रमानंतर शेतकऱ्यांसाठी भोजनाची व्यवस्था करत शेतकऱ्यांना शाल देऊन गौरविण्यात आले. तर मळणी झाल्यानंतर एका पाकिटाला निघालेले ४० पोते म्हणजेच जवळपास २५ क्विंटल मका केले.

'शुद्ध बीजापोटी. फळे रसाळ गोमटी' याप्रमाणे आपण चांगल्या कंपनीच्या बियाणांच्या वाणाची निवड केल्यास नक्कीच उत्पादन अपेक्षेप्रमाणे मिळू शकते. त्याचे हे उदाहरण समोर ठेवायला हरकत नाही.

कारण कोणतीच कंपनी आपल्या मळणी प्रात्यक्षिक करून दाखवत नाही किंवा उत्पादनाचीदेखील हमी देत नाही. त्यामुळे पोयोनीयस कंपनीचेदेखील नक्कीच कौतुक करायला हवे, कारण शेतकऱ्यांसाठी असे उपक्रम राबवून शेतकऱ्यांचीदेखील प्रगती व्हावी अशा विचार करणाऱ्या मोजक्याच कंपन्या दिसत आहे आणि त्यात ही पायोनीयस कंपनी आहे, असेच म्हणावे लागेल, असे मनोगत शेतकरी प्रल्हाद जाधव यांनी व्यक्त केले.

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

